| | | | |
|---|---|---|---|
| MHAH160001492022 | दाखल दिनांक | :- | ०८.०२.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०८.०२.२०२२ |
| | निकाल दिनांक | :- | २३.०३.२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०४ ०१ १५ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अकोले,**
**ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी अनंत. रा. टेंगसे )

न्यायनिर्णय घोषीत दिनांक – २३ मार्च, २०२६

(नियमित फौजदारी खटला क्र. २९/२०२२) **निशाणी ६४**

गुन्हा नोंद क्रं. ३५/२०२२, अकोले पोलीस स्टेशन, ता. अकोले.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>अकोले पोलीस स्टेशन, अकोले,<br>ता. अकोले, जि. अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे | | विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती. एस. ए. भोसले. |
| आरोपी | | **आशितोष उर्फ अतुल बाबासाहेब उगले,**<br>वय – २१ वर्षे,<br>रा. डोंगरगाव, ता. अकोले, जि. अहमदनगर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. व्ही. एम. उगले. |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २२.०१.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २२.०१.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०५.०२.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०६.०८.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १३.०७.२०२३ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | नाही. |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २३.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आशुतोष उर्फ अतुल बाबासाहेब उगले | २४.०१.२०२२ | २४.०१.२०२२ | भा.द.वि. कलम ३७९ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष साक्षीदार**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | किरण संजय परदेशी | घटनास्थळ पंच | १७ |
| २. | पो.कॉ. आनंद सुरेश मैड | फिर्यादी | २६ |
| ३. | पो.ना. सोमनाथ मंगळा पटेकर | साक्षीदार | ३२ |
| ४. | पो.ना. अजित बाजीराव घुले | तपासी अंमलदार | ३४ |
| ५. | पो.उपनिरिक्षक किरण सुभाष साळुंके | साक्षीदार | ५० |

**ब. बचावपक्ष साक्षीदार, जर असेल तर-**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | - | - | - |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल तरः**

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १. | — | — | — |

**सरकारपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांनी दिलेल्या निशाण्या**

**अ. सरकारपक्ष**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १८ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २. | २७ | फिर्याद |
| ३. | २८ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ४. | ३५ | तपास आदेशाची प्रत |
| ५. | ५१ | पंचनामा |

**ब. बचावपक्ष**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | — | —— |

**क. न्यायालयीन निशाणी**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | — | —— |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक २३.०३.२०२६ रोजी घोषित केले)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द त्याने भारतीय दंड संहिता (यापुढे थोडक्यात भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) कलम ३७९ नुसार गुन्हा केलेचे आरोपांबाबत चालविण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे –**

**२.** दिनांक २२.०१.२०२२ रोजी फिर्यादी तसेच पो.स.ई. साळुंके पो.ना. घुले, पो.कॉ. साबळे असे पोलीस स्टेशनला हजर असताना

स.पो.नी मिथुन घुगे साहेबांनी त्यांना त्यांचे कॅबिनमध्ये बोलावुन कळविले की, आत्ताच गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली आहे की, डोंगरगाव शिवारात आढळा नदीपात्रात अनाधिकृतपणे एका ट्रॅक्टरमध्ये चोरुन वाळु भरत आहे तरी आपण सदर ठिकाणी जावुन खात्री करून कायदेशीर कार्यवाही करा असे सांगितल्याने ते, पो.स.ई साळुंके, पो.ना. घुले, पो.कॉ. साबळे व चालक पो.ना पटेकर असे सरकारी वाहनाने पोलीस स्टेशन मधुन निघुन डोंगरगाव गावाचे शिवारात गेले असता तेथे आढळा नदीचे पात्रात एक महिंद्रा ५७५ डीआय कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर नं. एम.एच १७ बी.वाय. ७४२० हा वाळू भरुन तेथुन जात असतांना त्यांना दिसला. त्यावेळी त्यांनी १२:०० वाजताचे सुमारास सदर ट्रॅक्टर थांबविला असता त्यावरील चालकास पोलीसांची चाहुल लागताच तो ट्रॅक्टर जागेवर सोडून पळून गेला. पळुन गेलेल्या इसमाचे नावाची आजुबाजुचे लोकांकडे चौकशी केली असता त्याचे नाव अतुल बाळासाहेब उगले रा. डोंगरगाव, ता. अकोले असे समजले त्या वेळी सदर ठिकाणी एक ब्रास वाळू ६,०००/– रूपये किंमतीची व २,००,०००/– रूपये किंमतीचा ट्रॅक्टर मिळून आला व त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरूध्द कायदेशीर फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीच्या फिर्यादीवरुन अकोले पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गु.र.क्र. ३५/२०२२ भा.द.वि.चे कलम ३७९ प्रमाणे नोंदविण्यात आला. त्यानंतर फिर्यादी यांनी पुरवणी जबाब देवून फिर्याद देतेवेळी सदर ट्रॅक्टरवर अस्पष्ट स्वरूपात ट्रॅक्टर नंबर एम.एच १७ बी.वाय. ७४२० असा होता परंतु, ट्रॅक्टरचे कागदपत्र सादर केले असता सदर ट्रॅक्टरचा नंबर एम.एच. १७ बी.एक्स. ४६७४ असा आहे. अन्वेषण अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. त्यांच्या तपासात आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा

मिळुन आलेने त्यांनी आरोपीविरुध्द भा.द.वि.चे कलम ३७९ अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी ११ कडे भा.द.वि.चे कलम ३७९ प्रमाणे दोषारोप निश्चीत केले. निशाणी १२ नुसार आरोपीची जबानी नोंदविण्यात आली. आरोपीने गुन्हा नाकबूल करून संपरिक्षेची मागणी केली. अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यात प्रस्तुत आरोपीविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्याचे विरुध्द निशाणी ५३ खाली फौजदारी प्रक्रिया संहिता ( यापुढे थोडक्यात ''संहिता'' असे संबोधण्यात येईल ) कलम ३१३ नुसार निवेदन नोंदविण्यात आले.

**५.** अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एम. उगले यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कषार्थ खालील मुद्दे निघतात. त्याचे उत्तरे मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिली आहे.

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने दिनांक २२.०१.२०२२ रोजी दुपारी १२:१० वाजताचे सुमारास डोंगरगाव, ता. अकोले, जि. अहमदनगर येथील आढळा नदीतील शासनाच्या मालकीची गौणखनीज एक ब्रास वाळू त्यांच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच. १७ बी.एक्स ४६७४ च्या सहाय्याने कोणत्याही वैध परवानगीशिवाय चोरी केली, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| **२.** | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता**

६. आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पाच साक्षीदारांची साक्ष नोंदवली. त्यात पंच किरण संजय परदेशी (स.सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी १७ वर, फिर्यादी पो.कॉ. आनंद सुरेश मैड (स.सा.क्र.२) यांची साक्ष निशाणी २६ वर, पो.ना. सोमनाथ मंगळा पटेकर (स.सा.क्र.३) यांची साक्ष निशाणी ३२ वर, तपासी अंमलदार पो.ना. अजित बाजीराव घुले (स.सा.क्र.४) यांची साक्ष निशाणी ३४ वर, पो.उपनिरिक्षक किरण सुभाष साळुंके (स.सा.क्र.५) यांची साक्ष निशाणी ५० वर नोंदवली आहे.

७. पंच किरण संजय परदेशी (स.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २२.०१.२०२२ रोजी ते त्यांच्या कामानिमित्त अकोले पोलीस स्टेशन येथे गेले होते. त्यावेळी पोलीसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली होती. त्यांचे समक्ष कोणताही पंचनामा झाला नव्हता.

८. फिर्यादी पो.कॉ. आनंद सुरेश मैड (स.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २२.०१.२०२२ रोजी ते पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नेमणुकीस होते. त्यादिवशी सकाळी ११ वाजणेच्या सुमारास सहा. पोलीस निरिक्षक मिथून घुगे यांनी त्यांना व पो.ना. घुले, पी.एस.आय. साळुंके, पो.कॉ. साबळे अशांना डोंगरगाव शिवारात आढळा नदीपात्रात अनाधिकृत वाळू उपसा व वाहतूक होत असल्याची माहिती दिली. ते सरकारी वाहनाने डोंगरगावाच्या शिवारात पाहणी करण्याकरीता गेले असता आढळा नदीचे पात्रात लाल

रंगाचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर ज्याचा नोंदणी क्र. एम.एच. १७ बी.वाय. ७४२० दिसून आला. सदर ट्रॅक्टर हा वाळू उपसा करून वाहतूक करत असताना दिसून आला. त्यांनी त्यास थांबवले. चालक हा ट्रॅक्टर थांबवून पळून गेला. तेथे स्थानिक लोकांना विचारणा केली असता त्याचे नाव अतुल उगले असल्याचे सांगितले. ट्रॅक्टरची पाहणी केली असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू आढळून आली. पी.एस.आय. साळुंके यांनी सदर ट्रॅक्टर मुद्देमालासह ताब्यात घेतला व पोलीस स्टेशनला घेवून आले. त्यानंतर बेकायदेशिर रित्या वाळू उपसा करून वाहतूक करत असल्याबाबत पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. त्यांनी ज्यावेळी फिर्याद दिली त्यावेळी ट्रॅक्टरवरील नंबर अस्पष्ट असल्याने त्यांनी तो तसा फिर्यादीमध्ये सांगितला होता. नंतर चौकशी केली असता कागदपत्रावरून सदर ट्रॅक्टरचा नंबर वेगळा असल्याचे समजले. त्याबाबत त्यांनी पुरवणी जबाब दिला होता. परंतु, आजरोजी बराच कालावधी झाला असल्यामुळे नंतर सांगितलेला नंबर त्यांना आता आठवत नाही.

९. पो.ना. सोमनाथ मंगळा पटेकर (स.सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २२.०१.२०२२ रोजी ते पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस नाईक म्हणून नेमणुकीस होते. त्यादिवशी सकाळी ११ वाजणेच्या सुमारास सहा. पोलीस निरिक्षक मिथून घुगे यांनी त्यांना व पो.ना. घुले, पी.एस.आय. साळुंके, पो.कॉ. साबळे व पो.कॉ. मैड अशांना डोंगरगाव शिवारात आढळा नदीपात्रात अनाधिकृत वाळू उपसा व वाहतूक होत असल्याची माहिती दिली. ते सरकारी वाहनाने डोंगरगावाच्या शिवारात पाहणी करण्याकरीता गेले असता आढळा नदीचे पात्रात एक ट्रॅक्टर ट्रॉलीसह दिसून आले. सदर लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर ज्याचा नोंदणी क्र. एम.एच. १७ बी.वाय. ७४२० दिसून आला. सदर

ट्रॅक्टर हा वाळू उपसा करून ट्रॉलीमध्ये वाहतूक करत असताना दिसून आला. त्यांनी त्यास थांबवले. चालक हा ट्रॅक्टर थांबवून पळून गेला. तेथे स्थानिक लोकांना विचारणा केली असता त्याचे नाव अतुल उगले असल्याचे सांगितले. ट्रॅक्टरची पाहणी केली असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू आढळून आली. पी.एस.आय. साळुंके यांनी सदर ट्रॅक्टर मुद्देमालासह ताब्यात घेतला व पोलीस स्टेशनला घेवून आले. त्यानंतर बेकायदेशिर रित्या वाळू उपसा करून वाहतूक करत असल्याबाबत पोलीस स्टेशन येथे श्री. मैड यांनी फिर्याद दिली. तपास अधिकारी यांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. तपास अधिकारी यास जबाब देतेवेळेस त्यांनी ट्रॅक्टरचा क्र. एम.एच.१७ बी.वाय. ७४२० असा सांगीतला होता कारण कारवाई दरम्यान तो अस्पष्ट असल्याने तसा दिसत होता. परंतु, तपासादरम्यान कागदपत्र पाहिल्यानंतर सदर ट्रॅक्टरचा नं. एम.एच.१७ बी.एक्स.४६७४ असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे तसा पुरवणी जबाब त्यांनी तपास अधिकारी यांना सांगीतला होता. ट्रॉलीला नंबर नव्हता.

**१०.** तपासी अंमलदार पो.ना. अजित बाजीराव घुले (स.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २२/०१/२०२२ रोजी ते पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी गु.र.नं. ३५/२०२२ चा तपास पोलीस ठाणे अंमलदार श्री. लांडे यांनी त्यांच्याकडे लेखी आदेशान्वये दिला होता. सदरच्या आदेशासोबत त्यांना फिर्याद, पंचनामा, छापील प्रथम खबर अहवाल, मुद्देमालाची पावती व दैनिक अहवाल देण्यात आला होता. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदवले व आरोपीस अटक केली. कागदपत्रांवरून आरोपीने शासकीय वाळू स्वत:च्या फायद्यासाठी विना परवाना बेकायदा विक्री करतानाचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरुध्द

न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**११.** पो.उपनिरिक्षक किरण सुभाष साळुंके (स.सा.क्र.५) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २२.०१.२०२२ रोजी ते पोलीस स्टेशन अकोले येथे परिविक्षाधीन पोलीस उपनिरिक्षक म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी पोलीस स्टेशनला कार्यरत असताना पोलीस निरिक्षक श्री. घुगे यांना गुप्त बातमीदाराद्वारे बातमी मिळाली की, डोंगरगाव शिवारात आढळा नदीपात्रात अवैधरित्या वाळु उपसा चालू आहे. त्यांनी त्यांना आदेश दिले की, तुम्ही त्या ठिकाणी जावून पाहणी करा व काही मिळून आल्यास कारवाई करा. त्यानंतर ते त्यांचा पोलीस स्टाफ व दोन पंचांसह सरकारी वाहनाने तेथे गेले. सदर ठिकाणी महिंद्रा कंपनीच्या ट्रॅक्टरमध्ये वाळु भरण्याचे काम चालू होते. सदर ट्रॅक्टर भरलेला होता त्यांनी त्यास थांबवून विचारणा केली तेव्हा तो पळून गेला. पळून गेलेल्या इसमाचे नाव अतुल बाबासाहेब उगले असे होते. सदर ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास वाळु होती. सदर ट्रॅक्टरचा नोंदणी क्रमांक बी.एक्स ४६७४ असा होता. पंचनामा करताना नंबर स्पष्ट नसल्यामुळे तो बी.वाय ७४२० असा झाला होता. कागदपत्र पाहिल्यानंतर तो एम.एच १७ बी.एक्स ४६७४ असा असल्याचे निष्पन्न झाले. तेथे आजुबाजूला लोकांकडे चौकशी केली असता आरोपीचे नाव निष्पन्न झाले. ट्रॅक्टर ट्रॉली व वाळुसह जप्त करून दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. सदर गुन्ह्याच्या कामी त्यांचा जबाब नोंदवला होता.

**१२.** फिर्यादी आनंद मैड (स.सा.क्र.२) यांनी आढळा नदीपात्रात लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर ज्याचा नोंदणी क्रमांक एम.एच १७ बी. वाय ७४२० दिसून आला व ट्रॅक्टरवरील नंबर अस्पष्ट असल्याने त्यांनी तो तसा फिर्यादीमध्ये सांगितला होता व कागदपत्रावरून सदर ट्रॅक्टरचा नंबर वेगळा असल्याचे कथन केले आहे. फिर्यादीच्या सदर पुराव्यास सोमनाथ

पटेकर (स.सा.क्र.३) किरण साळुंके (स.सा.क्र.५) यांनी दुजोरा दिला. परंतु, फिर्यादीने फिर्याद देतेवेळी सदर ट्रॅक्टरवरचा नंबर अस्पष्ट असल्याबाबत काहीही कथन केलेले नाही यावरून फिर्यादीच्या तसेच साक्षीदारांच्या सदरच्या कथनाबाबत साशंकता निर्माण होते व त्याचा फायदा आरोपीस जातो.

**१३**. किरण साळुंके (स.सा.क्र.५) यांनी सुध्दा त्यांच्या पुराव्यामध्ये ट्रॅक्टरचा नोंदणी क्रमांक बी.एक्स ४६७४ असा होता. पंचनामा करताना नंबर अस्पष्ट असल्यामुळे तो बी.वाय ७४२० असा झाला होता परंतु, सदर साक्षीदाराने निशाणी ५१ वर केलेल्या पंचनाम्यामध्ये सदर ट्रॅक्टरचा नोंदणी क्रमांक अस्पष्ट असल्याबाबत सुध्दा काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीबाबतही साशंकता निर्माण होते. फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये त्यांनी वाळू उपसा करून वाहतुक करत असणा-या चालकास थांबवले व ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टर थांबवून पळून गेला. स्थानिक लोकांना विचारणा केली असता त्याचे नाव अतुल उगले असल्याचे समजल्याचे कथन केले आहे. फिर्यादीच्या सदरच्या पुराव्यास सोमनाथ पटेकर (स.सा.क्र.३) व किरण साळुंके (स.सा.क्र.५) यांनी दुजोरा दिलेला आहे. परंतु, सदर तिनही साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी कोणत्या स्थानिक लोकांकडे विचारणा केली होती याबाबत काहीही कथन केलेले नाही यावरून सदर साक्षीदारांनी स्थानिक लोकांकडे चौकशी केली होती आणि आरोपीचे नाव अतुल उगले हे त्यांना समजले या फिर्यादीच्या व साक्षीदारांच्या पुराव्याबाबत साशंकता निर्माण होते व त्याचा फायदा आरोपीस जातो.

**१४**. किरण साळुंके (स.सा.क्र.५) यांनी घटनास्थळी ट्रॅक्टर व ट्रॉली वाळुसह जप्त करून दोन पंचांसमक्ष पंचनामा (निशाणी ५१) केल्याचे

कथन केलेले आहे. परंतु, आनंद सुरेश मैड (स.सा.क्र.२), सोमनाथ पटेकर (स.सा.क्र.३) या साक्षीदारांनी पी.एस.आय साळुंके यांनी सदर ट्रॅक्टर मुद्देमालासह ताब्यात घेतला व पोलीस स्टेशनला घेवून आल्याचे कथन केले आहे. सदर दोन्ही साक्षीदारांनी त्या ठिकाणी पी.एस.आय साळुंके यांनी पंचनामा केला होता याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे पी.एस.आय साळुंके (स.स.क्र.५) यांच्या पुराव्यास त्यांच्या सोबत कारवाई करता असणा–या पोलीस कर्मचा–यांच्या साक्षीपुराव्याने परिपुष्टी येत नाही. त्यामुळे त्याबाबतच्या फिर्यादी, साक्षीदार व पंचनामा करणारे अधिकारी यांच्या साक्षीपुराव्यास विसंगती असल्याचे दिसून येते. यावरून घटनास्थळी पी.एस.आय साळुंके (स.सा.क्र.५) यांनी ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळुचा पंचनामा केला होता याबाबत सुध्दा संशय निर्माण होता. फिर्यादी आनंद मैड (स.सा.क्र.२) व सोमनाथ पटेकर (स.सा.क्र.३) यांनी ट्रॉलीसह ट्रॅक्टर ताब्यात घेतला होता याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे सदर दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याने पी.एस.आय साळुंके (स.सा.क्र.५) यांच्या साक्षीपुराव्यास पुष्टी येत नाही.

**१५.** फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, ट्रॅक्टर व ट्रॉली ही दोन वेगळी वाहने आहेत. तसेच पुढे त्यांनी असेही मान्य केले आहे की, सदर ट्रॅक्टरमध्ये वाळू नव्हती. तसेच ज्या ठिकाणावरून वाळू उचलली होती त्याठिकाणच्या खड्ड्याचा व वाहनाचा पंचनामा त्यांच्या समक्ष झाला नव्हता. तसेच सोमनाथ पटेकर (स.सा.क्र.३) यांनी सुध्दा त्यांच्या उलटतपासामध्ये ट्रॅक्टर व ट्रॉली हे दोन वेगळी वाहने आहेत व ट्रॉलीमध्ये वाळू होती ही बाब त्यांनी जबाब देतेवेळी तपास अधिकारी यांना सांगितली नसल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, खड्ड्याचा व वाहनाचा पंचनामा

त्यांचेसमक्ष झाला नव्हता. किरण साळुंके (स.सा.क्र.५) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांनी प्रत्यक्ष वाळू भरताना पाहीले नाही. तसेच अकोले येथून किती वाजता सरकारी वाहनाने गेले याची नोंद स्टेशन डायरीला त्यांनी केली नव्हती.

**१६.** उपरोक्त पुराव्यावरून व विवेचनावरून कारवाई करणा–या कोणत्याही पोलीस कर्मचा–याने त्यांना आरोपीचे नाव कोणाकडून समजले याबाबत अभिलेखावर न दिलेला पुरावा, घटनास्थळावर ट्रॅक्टर व ट्रॉलीचा पंचनामा झाला होता याबाबत साक्षीदार यांच्या पुराव्यामध्ये दिसून येणारी विसंगती, फिर्यादी यांनी ट्रॉलीमध्ये वाळू नसल्याचे मान्य केलेली बाब तसेच पोलीस साक्षीदार यांनी तपास अधिकारी यांना जबाब देतेवेळी ट्रॉलीमध्ये वाळू नव्हती ही न सांगीतलेली बाब यावरून दिनांक २२.०१.२०२२ रोजी आरोपी हा त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टरने शासकीय मालकीची वाळू अवैध उपसा करून वाहतुक करताना आढळून आला ही बाब वाजवी संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचे दोषारोपातील आरोपी हे वाजवी संशयापलीकडे सिध्द केले आहेत असे म्हणता येणार नाही. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>**

**१७.** मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्षावरून आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो. सदर प्रकरणात एम.एच. १७ बी.एक्स ४६७४ हा ट्रॅक्टर जप्त असल्यामुळे व तो मुळ मालकास सुपुर्दनाम्यावर परत दिला असल्यामुळे त्याबाबत आदेश करणे आवश्यक आहे. सदर न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपिल किंवा इतर कार्यवाहीमध्ये हजर राहण्याची हमी म्हणून आरोपीने जामीन दिला आहे. सबब मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपीला भा.द.वि.चे कलम ३७९ या कलमाअंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचा जामीन कदबे व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपीने संहितेचे कलम ४३७–अ नुसार दिलेला जामीन हा पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरीता वैध राहील. |
| ४. | जप्त ट्रॅक्टर मुळ मालकास परत दिला असल्यामुळे अपील कालावधीनंतर सुपुर्दनामा कायम राहील व जप्त दाखवलेली वाळू ही अपील कालावधीनंतर तहसिलदार अकोले यांच्याकडे विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावी. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.03.24 17:30:41 +0530

दिनांक २३/०३/२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, या पी.डी.एफ फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | शैलेश पोपट पालवे,<br>लघुलेखक (श्रेणी – ३) |
| न्यायालयाचे नाव | – | श्री. अनंत रा. टेंगसे,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोर्ट नं. २, अकोले. |
| न्यायनिर्णय दिनांक | – | २३/०३/२०२६ |
| न्यायदंडाधिकारी सही | – | २३/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | – | २४/०३/२०२६ |